# ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद पालघर

जा.क्र.पाजिप/ग्रापं/कार्या- ०२/वशी-४५८/२०१९ दिनांक :- २३.०५.२०१९

प्रति,
गटविकास अधिकारी,
पंचायत समिती (सर्व)

विषय:- जिल्हा परिषद पालघर अंतर्गत गट क (वर्ग-३) व गट ड (वर्ग-४) कर्मचाऱ्यांच्या बदल्या सन २०१९ वास्तव जेष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :- ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक जिपब/४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४ दिनांक १५ मे २०१४

ग्रामविकास विभागाकडील संदर्भिय शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदेच्या गट क (वर्ग-३) व गट ड (वर्ग-४) कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे धोरणाची अंमलबजावणी करणेबाबत आदेशीत केलेले आहे. त्या अनुषंगाने ग्रामपंचायत विभागाकडील विस्तार अधिकारी (पंचायत), ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक या संवर्गातील कर्मचारी यांचे सन २०१९ संदर्भातील जिल्हा परिषद, पालघर अंतर्गत गट विकास अधिकारी यांचेकडुन प्राप्त माहितीनुसार वास्तव सेवाजेष्ठता यादी सोबत जोडुन प्रसिध्द करण्यांत येत आहे.

सदर वास्तव जेष्ठता यादी आपल्या अधिनस्त कार्यरत संबंधित कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून त्यांची दिनांकित पोहोच या कार्यालयास सादर करण्यात यावी तसेच सदर जेष्ठता यादीबाबत काही हरकती/ आक्षेप असल्यास लेखी हरकती/ आक्षेप आपल्या स्वयंस्पष्टअभिप्रायासह हरकत घेतलेल्या कर्मचाऱ्यांच्या मुळ सेवापुस्तकासह संबंधित लिपीकास दिनांक २७.०५.२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत या कार्यालयांस उपस्थित राहण्याच्या सुचना देण्यात याव्यात.

तसेच दिनांक २७.०५.२०१९ रोजी संबंधित लिपीक यांनी वास्तव सेवा जेष्ठता यादीची सहयांची प्रत, रिक्त पदांची यादी व वदलीबाबत देण्यांत आलेली माहिती बरोबर असल्याचे प्रमाणपत्र सोबत आणणेबाबत सुचना देण्यात याव्यात.

सोबत:- विस्तार अधिकारी (पंचायत), ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक यांच्या वास्तव जेष्ठता यादी जोडली आहे.

(अशोक पाटील)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
जिल्हा परिषद पालघर

प्रत:- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांना माहितीसाठी सविनय सादर
प्रत:- उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) जिल्हा परिषद पालघर यांना माहितीसाठी.



Scanned by CamScanner